पुणे शहर पोलीस

# दर्पण

नोव्हेंबर २०१९

# अभिप्राय...

प्रति,
मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो.,
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपोर्ट :- डी. एस. जाधव [illegible] शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर
[illegible]

विषय :- दर्पण पुस्तिकाबाबत अभिप्रायबाबत

महोदय,

[illegible]

पो. हवालदार [illegible]
दि. [illegible]

(डी.एस. जाधव)
पोलीस हवालदार [illegible]
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर

---

प्रति,
मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो.,
वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे.
यांना सविनय सादर......

**प्रतिवेदक :-** संध्या एस.शेंडे पो.शि.[illegible],
वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे.

**विषय :-** दर्पण या मासिकाबाबत अभिप्राय सादर केलेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास सविनय सादर की, आम्हास दर्पण या मासिकाबाबत अभिप्राय मागवला असता त्याबाबत आमचा अभिप्राय असा की, सदरक्षणाय खलनिग्रहणाय या म्हणीप्रमाणे पोलीसांच्या कार्याचे प्रतिबिंब हे दर्पणामधून दिसत असल्याने पोलीस विषयी कार्याचा गौरव समाजात होत असल्याने पोलीसांविषयी समाजात चांगली स्वच्छ प्रतिमा तयार होणेसाठी दर्पणच्या माध्यमातून पोलीसांच्या कार्याचा गौरव समाजापर्यंत पोहचण्याचे एक चांगले माध्यम आहे. पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी हे आपले कार्याचे प्रतिबिंब समाजात दिसावे म्हणून पोलीस चांगली अधिक काम करण्याची धडपड चालू आहे.

दर्पण या मासिकामुळे पुणे शहर पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कामगिरीची प्रसिद्धी या माध्यमातून स्थानिक नागरीकांपर्यंत पोहचू लागली. त्यामुळे पोलीसांची केलेल्या उत्तम कामगिरी लोकांच्या माध्यमातून स्वागत करु लागले. पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशन कडील उत्तम कामगिरीबाबत ज्या पोलीस स्टेशनची प्रसिद्धी झाली त्यावेळी इतर पोलीस स्टेशनकडील अधिकारी व कर्मचारी यांची भावना आपले पण पोलीस स्टेशनचे नाव या कामगिरीबाबत यायला पाहिजे पोलीस स्टेशनचे नाव लौकीक व्हावे म्हणून पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेमध्ये उत्तम कामगीर करण्याची स्पर्धा होवू लागली. त्यामुळे हद्दीमध्ये पेट्रोलींग,गोपीनिय माहिती ,हद्दीपार आरोपी व इतर स्वरुपाची गोपीनिय माहिती काढून त्यामध्ये आरोपी यांचेवर कडक कारवाई होवू लागल्याने आरोपी यांचेवर वचक बसल्याने गुन्हयाचे प्रमाण कमी होवू लागले.

दर्पणामध्ये आमचे कार्याचे प्रतिबिंब उमट असल्याने आम्हाला दर्पणाचा सार्थ अभिमान आहे.पोलीस प्रशासनाचे स्वच्छ व समाजाभिमुख कार्य या दर्पणामधून समाजासमोर येत असल्याने समाजात पोलीस प्रशासनाच्या कार्याचा व विश्वासार्हतेचा आलेख वाढत आहे. बाबरोबरच समाजातील समाजविघातक व्यक्तींवर वचक बसत आहे. तसेच दर्पणामुळे पोलीसांविषयी समाजात स्वच्छ व चांगली प्रतिमा होणेसाठी मदत होत आहे.

(संध्या एस.शेंडे)
पोलीस कॉन्स्टेबल
वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे.

# गुन्ह्यांना पायबंद

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) गुन्ह्यांना पायबंद | : | १ ते १८ |
| २) कारवाई | : | १९ ते ४२ |
| ३) लोकाभिमुख उपक्रम | : | ४३ ते ६६ |
| ४) पोलिसांमधील माणूस | : | ६७ ते ७४ |
| ५) समुपदेशन व सामाजिक बांधीलकी | : | ७५ ते ८८ |
| ६) वाहतुक सुलभता | : | ८९ ते ९८ |
| ७) उत्कृष्ट कार्य | : | ९९ ते १०२ |
| ८) उत्कृष्ट तपास | : | १०३ ते १२२ |

लोकमत – दि. ३ नोव्हेंबर, २०१९

# दुर्मिळ हस्तिदंताची तस्करी करणारे दोघे जेरबंद

## विमानतळ पोलिसांची कामगिरी। पन्नास लाख रुपये किमतीचे दोन हस्तिदंत व मुद्देमाल हस्तगत

लोकमत न्यूज नेटवर्क

विमाननगर : दुर्मिळ हस्तिदंताची तस्करी करणाऱ्या दोघांना विमानतळ पोलिसांनी शुक्रवारी रात्री अटक केली. याप्रकरणी वन्यप्राणी संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करून याहिया अहमद खान (वय ४२, रा. कोपरखैरणे, नवी मुंबई) व अभय अरविंद जोशी (वय ५५, रा.नेरूळ, नवी मुंबई) या दोघांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून अंदाजे पन्नास लाख रुपये किमतीच्या दोन दुर्मिळ हस्तिदंतासह गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



दुर्मिळ हस्तिदंताची तस्करी करणाऱ्या दोघा आरोपींसह विक्रीसाठी आणलेले हस्तिदंत व गुन्ह्यातील मुद्देमालासोबत विमानतळ पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि. २२) सायंकाळी चार वाजता दुर्मिळ हस्तिदंताची तस्करी करणारे दोन इसम विमाननगर येथे येणार असल्याची खात्रीशीर माहिती विमानतळ पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार विमानतळ पोलीस व वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या वनसंरक्षक अधिकारी यांनी सापळा रचून केलेल्या कारवाईत दोघांना हस्तिदंतासह ताब्यात घेण्यात आले. अधिक तपासात हे दुर्मिळ हस्तिदंत विक्री करण्यासाठी आल्याची माहिती त्यांनी दिली.

अपर पोलीस आयुक्त सुनील फुलारी, उपायुक्त प्रसाद अक्कानवरु, सहायक आयुक्त रामचंद्र देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गजानन पवार, पुणे निरीक्षक बळवंत मांडगे, वनसंरक्षक अधिकारी दया डोमे, तपास पथकातील उपनिरीक्षक ए.डी.शिंगाडे, पोलीस कर्मचारी अविनाश शेवाळे, अशोक आटोळे, अजय खराडे, विश्वनाथ गोणे, विशाल गाडे, राहुल मोरे, संजय आढारी, नाना कर्चे, प्रशांत कापुरे, विनोद महाजन यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

या प्रकरणी या दोघांना न्यायालयात हजर केले असता, हे हस्तिदंत त्यांनी कोठून आणले होते, त्यांचे आणखी कोणी साथीदार आहे का?, त्यांच्याकडे आणखी हस्तिदंत आहे का? त्यांच्याकडे आणखी कोणत्या प्राण्यांची कातडी आहेत का? याचा तपास करण्यासाठी त्यांना पोलीस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकील राजश्री कदम यांनी केली. त्यानुसार न्यायालयाने आरोपींची रवानगी पोलीस कोठडीत केली आहे.

# ऑपरेशन ऑल आउटचा गुन्हेगारांनी घेतला धसका

**नवनाथ शिंदे**

पुणे : शहरातील कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलिसांनी सुरू केलेल्या ऑपरेशन ऑल आउट मोहिमेचा गुन्हेगारांनी धसका घेतला आहे. त्यामुळे दंगा, मारामारी, घातक शस्त्र बाळगणाऱ्यांसह तडीपार गुंडांमध्ये कारवाईची भीती निर्माण झाली आहे. गुन्हे शाखेकडून राबविण्यात येत असलेल्या ऑपरेशन ऑल आउट मोहिमेंतर्गत सराईतांसह रेकॉर्डवरील गुन्हेगारांची कुंडली तपासली जात आहे. त्यानुसार सद्यस्थितीत आरोपींचे वास्तव्य आणि हालचालींवर करडी नजर ठेवण्यात येत आहे. आतापर्यंत करण्यात आलेल्या कारवाईत १५० तडीपार गुन्हेगारांचे रेकार्ड तपासण्यात आले, तर ६१ बार, ३१ मसाज पार्लर, ७ लॉजची झाडाझडती घेण्यात आली. संघटितपणे गुन्हेगारी करणाऱ्या टोळ्यांतील आरोपींची माहिती घेण्यात येत असून, कारवाईदरम्यान सापडलेल्या गुंडांची रवानगी कारागृहात करण्यात आली आहे.

गुन्हे शाखेकडून ऑपरेशन ऑल आउट विशेष मोहिमेला प्रारंभ करण्यात आला आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत असलेले सराईत, रेकॉर्डवरील गुन्हेगार, मोक्कांतर्गत कारवाई झालेल्या टोळ्यांतील आरोपी, महाविद्यालयीन परिसरात दादागिरी आणि गुंडगिरी करणाऱ्यांची माहिती एकत्रित करण्यात आली आहे. त्यानुसार त्यांच्याविरुद्ध कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. पोलिसांकडून कारवाईसंदर्भात विशेष धोरण राबविल्यामुळे गुन्हेगारांमध्ये खळबळ उडाली आहे. प्रामुख्याने सराईत गुन्हेगारांवर करडी नजर ठेवण्यात येत असल्यामुळे छोट्या-मोठ्या टोळ्यांचे धाबे दणाणले आहे.

तसेच तडीपार असतानाही पूर्वपरवानगीशिवाय हद्दीत आलेल्या आरोपींची माहिती घेतली जात आहे. आरोपी परिसरातील नागरिकांमध्ये दहशत निर्माण करत असल्याचे आढळल्यास त्यांची रवानगी कारागृहात करण्यात येत आहे. संबंधित पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोडा, दरोड्याची तयारी, खुनाचा प्रयत्न, संघटित गुन्हेगारी करणाऱ्यांचा डेटा जतन करण्यात आला आहे. त्यानुसार आरोपींची गुन्हा करण्याच्या पद्धतीसह विविध हद्दीतील गुन्ह्यांची माहिती गोळा करून कारवाईला गती देण्यात आली आहे. ऑपरेशन ऑल आउट मोहिमेमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहण्यास मदत होणार असल्याचे बोलले जात आहे.

पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम् यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे यांनी ऑपरेशन ऑल आउट मोहिमेसाठी कंबर कसली आहे. शहरातील विविध भागांत रात्री-अपरात्री विहीत वेळेनंतरही हॉटेल, बार, रेस्टॉरंट, पब सुरू ठेवणाऱ्यांनाही तंबी देण्यात आली आहे. वारंवार सूचना देऊनही नियम धाब्यावर बसवून हॉटेल्सह इतर आस्थापना सुरू ठेवल्यास संबंधित मालकांविरुद्ध पोलिसांकडून खटले दाखल करण्यात सुरुवात झाली आहे. त्यामुळे कारवाईच्या कचाट्यातून वाचण्यासाठी हॉटेलमालक, पबचालक, रेस्टॉरंटचालकांनी वेळेआधी आस्थापना बंद करण्यास प्राधान्य दिले आहे. मोहिमेंतर्गत शहरातील ३३ पोलीस ठाणी आणि १०३ पोलीस चौक्यांच्या हद्दीतील मसाज पार्लरवरही नजर ठेवण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. मसाजच्या नावाखाली मुलींकडून वेश्याव्यवसाय करवून घेणाऱ्या सेंटरची यादी तयार करण्यात आली आहे. त्यानुसार सेंटरमालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. बाहेरगावाहून आलेल्या नागरिकांच्या कागदपत्रांची खातरजमा न करता लॉजमध्ये प्रवेश देणाऱ्यांनाही सक्त ताकीद देण्यात आली आहे.

एकंदरीत नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलिसांनी सदैव दक्ष असणे गरजेचे आहे. हद्दीतील उशिरापर्यंत सुरू असलेले हॉटेल, लॉज, पब, रेस्टॉरंट, सार्वजनिक ठिकाणांवर बारीक नजर ठेऊन कारवाईचा बडगा उगारणे आवश्यक आहे. हद्दीतील गस्तीवर विशेष भर दिल्यास बहुतांश गुन्हेगारीला लगाम बसणार आहे. पोलीस ठाण्यांसह चौक्यांमध्ये कार्यरत असलेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची मरगळ झटकण्यासाठी वरिष्ठांना विविध मोहिमेचा आरंभ करावा लागतो. त्याऐवजी प्रत्येकाने कर्तव्याची जाण ठेवून काम केल्यास नागरिकांमध्ये सुरक्षिततेची हमी निर्माण होण्यास वेळ लागणार नाही.

**गुन्हे शाखेची विशेष मोहीम**



The Indian EXPRESS - 12 November, 2019

PROCURED MULTIPLE VEHICLE LOANS

# 3 held for cheating nine govt, private banks of Rs 59.5 lakh

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, NOVEMBER 11

POLICE HAVE arrested three persons for allegedly cheating nine government and private banks of Rs 59.5 lakh by providing vehicle loans through fake documents. The accused targeted people who wanted loans but did not have the required documents, police said.

Police identified the accused as Dhananjay Balasaheb Jadhav (48) of Hadapsar, Anand Premsingh Kumar alias Rajesh Parmar (41) of Katraj, Kondhwa Road, and Abhijit Ramesh Sonawane (30) of Kondhve Dhawade. They were arrested last week during an investigation into a case of cheating registered at the Vimantal police station by an official of Bank of Maharashtra.

A police team led by Senior Inspector Gajanan Pawar and Inspector Balwant Mandge arrested the accused following a technical investigation of the details obtained from the bank.

A press release issued on Monday stated that Parmar was the key accused in the case and targeted people who wanted a vehicle loan, but did not have required documents.

According to police, Parmar assured them of a loan and took original Aadhaar cards and photographs from them, following which, with the help of Sonawane, he would procure fake documents showing income tax returns.

Police said the documents were then submitted to the bank along with the vehicle loan proposal.

The accused were suspected to have cheated more banks in this manner, police said, adding that, as of now, they had recovered four vehicles worth Rs 40 lakh from them.

Police added that Parmar was in the construction business in Satara in the past, but after facing losses he moved to Pune and started cheating banks for financial gains with the help of Jadhav and Sonawane, who were both known to him.

Sakal Times - 06 November, 2019

# Cyber crime cell arrests fake IAS officer

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

PUNE: Officials of the Cyber Crime Cell arrested a 47-year-old man from Nalasopara East in Mumbai for allegedly posing as an IAS officer and cheating a woman to the tune of Rs 3 lakh on the pretext of marrying her.

Police Inspector Jayram Paigude of Cyber Crime Cell said the accused, identified as Nandlal Yadav, registered himself on a matrimony site and used fake identity card of an IAS officer.

"The accused posed as an IAS officer and used a fake name Akshansh Yadav. We have seized a fake identity card by the same name from the accused. Following the complaint from the victim, the accused was traced and arrested from Nalasopara in Mumbai. The victim approached the police after the accused did not marry her. We appeal to people to come forward if they have been cheated similarly," added Paigude.

**लोकमत – दि. २ नोव्हेंबर, २०१९**

## मोबाईल हिसकावून पळ काढणारा जेरबंद

पुणे : मोबाईल हिसकावून घेऊन पळ काढणाऱ्या एका सराइतास पुणे शहरच्या युनिट एकच्याकडून अटक करण्यात आली आहे. अली अब्बास शौकत इराणी (वय २१, रा. शिवाजीनगर रेल्वे स्थानकाजवळ) असे अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. त्याच्याकडून सात वेगवेगळ्या कंपन्यांचे ५० हजार रुपये किमतीचे मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. ३१ ऑक्टोबर रोजी पोलीस उपनिरीक्षक लहू सातपुते आणि उत्तम बुदगुडे, सहायक पोलीस फौजदार वसावे यांच्यासह पोलीस नाईक वाघवले, इरफान मोमीन, यांना युनिट १मध्ये गस्त घालत असताना आरोपी अली इराणी चोरीचे मोबाईल विकण्याकरिता शिवाजीनगर येथे स्थानक हॉटेलजवळ येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून अलीला ताब्यात घेतले. त्याच्याकडे मिळालेल्या मोबाईलपैकी दोन मोबाईलबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. आरोपीस डेक्कन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या कारवाईत सुधाकर माने, इम्रान शेख, तुषार खडके, योगेश जगताप, रिझवान जिनेडी, बाबा चव्हाण, सुभाष पिंगळे यांनी महत्वाची भूमिका बजावली.

**लोकमत – दि. ३ नोव्हेंबर, २०१९**

## कोयत्याच्या धाकाने लुटणाऱ्या तिघांना अटक

पुणे : कोयत्याचा धाक दाखवून एकाच रात्रीत दोघांना लुटणाऱ्या तिघा चोरट्यांना सिंहगड पोलिसांनी अटक केली आहे. अनिकेत पुरुषोत्तम खरात (वय १८, रा. वैभववस्ती, धायरी), स्वप्निल शिवाजी लवटे (वय १९, रा. अभिनव कॉलेज रोड, नऱ्हे) आणि आश्विन सुभाष भोसले (वय १९, रा. तुकाईनगर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांच एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्यावर यापूर्वी तीन गुन्हे दाखल आहेत.

याप्रकरणी संतोष उदेक (वय ३०, रा. नऱ्हे) यांनी सिंहगड रोड पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. ही घटना नऱ्हे परिसरात गुरुवारी रात्री पावणेदहाच्या सुमारास घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष आंबेगाव पठार येथील एका अभियांत्रिकी कंपनीत काम करतात. गुरुवारी रात्री पावणेदहाच्या सुमारास ते घरातून महामार्गावरून पायी जात होते. आरती नावाचे किराणामालासमोर ते आले असताना पाठीमागून दुचाकीवर आलेल्या तिघांनी त्यांना कोयत्याचा धाक दाखवून खिशातील १ हजार १०० रुपये जबरदस्तीने काढून घेतले. दुसरा प्रकार झील कॉलेज चौकात गुरुवारी रात्री साडेआठ वाजता घडला. दस्तगीर पठाण (वय ३८, रा. नऱ्हे) त्यांचा भाऊ व मित्रांसमवेत थांबले असताना तिघे जण मोटारसायकलवरून तेथे आले. पठाण यांच्या हातावर, पायावर कोयत्याने वार करून जखमी केले होते.

**लोकमत – दि. १६ नोव्हेंबर, २०१९**

## दीड लाख लांबविणाऱ्या दोघांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : टेम्पोच्या सीटवर ठेवलेले १ लाख ५८ हजार रुपये लांबविल्याप्रकरणी समर्थ पोलिसांनी दोन जणांना अटक केली. न्यायालयाने त्यांना दोन दिवस पोलीस कोठडीमध्ये ठेवण्याचा आदेश दिला.

सचिन राजपूत (वय २३, रा. चिंचवड), नकुल ऊर्फ आकाश सोलंके (वय २८, रा. थेरगाव) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. सुनील श्रीवास्तव (वय ४३) यांनी फिर्याद दिली आहे. ३१ ऑगस्ट २०१९ रोजी ही घटना घडली. श्रीवास्तव यांनी पाचशे, दोनशे व शंभर रुपयांच्या नोटा असलेले १ लाख ५८ हजार ३०० रुपये त्यांच्या टेम्पोच्या सीटवर ठेवून ते टेम्पोतून खाली उतरले होते. चोरट्यांनी ते पैसे लंपास केले, असे फिर्यादीत नमूद केले आहे. दोघांना न्यायालयात हजर केले असता, सखोल तपास करण्यासाठी, त्यांनी अशा प्रकारे आणखी गुन्हे केले आहेत का? त्यांचा आणखी कोणी साथीदार आहे का? याबाबतची कोठडीची मागणी केली.

लोकमत – दि. ५ नोव्हेंबर, २०१९

# तोतया आयएएस अधिकारी जाळ्यात

पुणे : [illegible] मॅट्रोमोनी साईटवर बनावट प्रोफाईल तयार करून महिलेला आयएएस असल्याची बतावणी करून ३ लाख रुपयांना फसविणाऱ्या तोतया अधिकाऱ्याला सायबर पोलिसांनी पालघरमधून अटक केली.

मंडलाल रामुदलार यादव (वय ४७, रा. नालासोपारा ईस्ट, पालघर) असे त्याचे नाव आहे. याबाबत पोलिसांनी सांगितले की, यादव याने मॅट्रोमोनी साईटवरून बनावट प्रोफाईल तयार करून हडपसर परिसरात राहणाऱ्या महिलेशी ओळख वाढविली. तिला आपण आयएएस असल्याची बतावणी केली. या महिलेचा विश्वास संपादन करून या महिलेला लग्नाचे आमिष दाखविले. त्याच्या नातेवाइकांच्या औषध उपचाराचे बनावट कारण सांगून एसबीआय बँकेच्या खात्यात ३ लाख रुपये भरायला लावले. त्यानंतर या महिलेशी लग्न न करता तसेच पैसे परत न करता फसवणूक केली होती.

सायबर पोलिसांनी त्याने या महिलेला केलेल्या मोबाईल नंबरवरून तांत्रिक तपास करून तो नालासोपारा परिसरात राहात असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यावरून नालासोपारा येथे जाऊन पोलिसांनी शोध घेऊन त्याला अटक केली. त्याच्याकडून ४ सिमकार्ड, गुन्ह्यात वापरण्यात आलेले पैकी २ पासबुक, दोन चेकबुक, दोन मोबाईल, आधारकार्ड, आयएएस असल्याचे बनावट ओळखपत्र जप्त केले आहे. त्याला न्यायालयात हजर केल्यावर न्यायालयाने अधिक तपासासाठी ५ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

यादव या नावाने वरील प्रकारे कोणाची फसवणूक झाली असल्यास त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ही कामगिरी पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहायक आयुक्त शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे, सहायक निरीक्षक अश्विनी पाटील, हवालदार असलम आतार, संतोष जाधव, भूषण शेलार, शिरीष गावडे, नवनाथ जाधव, ज्योती दिवाणे यांनी केली आहे.

लोकमत – दि. ५ नोव्हेंबर, २०१९

# तरुणीला अश्लील व्हिडीओ पाठविणाऱ्या तरुणाला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे : तरुणी असल्याचे भासवून फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारल्यानंतर तरुणीला अश्लील व्हिडीओ, मेसेज पाठविणाऱ्या तरुणाला सायबर पोलिसांनी सातारा येथून अटक केली आहे.**

संदीप गणपत जाधव (वय २८, रा. जैतापूर, पो. चिंचनेर, ता. जि. सातारा) असे त्याचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी सांगितले, की या तरुणाने तरुणीच्या नावाने सोशल मीडियावर फेक फेसबुक अकाऊंट तयार केले. पाषाण येथे राहणाऱ्या महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनीला त्याने फ्रेंड रिक्वेस्ट पाठविली. तरुणीची असल्याचे पाहून या तरुणीने ती रिक्वेस्ट स्वीकारली. त्यानंतर त्याने या तरुणीला अश्लील व्हिडीओ, फोटो व मेसेंजर, अतिअश्लील मेसेज पाठविले. सुरुवातीला या तरुणीने त्याकडे दुर्लक्ष केले. तेव्हा त्याने सातत्याने मेसेज करण्यास सुरुवात केली. त्याचा मानसिक त्रास झाल्याने या तरुणीने सायबर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला होता.

या अर्जाची प्राथमिक चौकशी केली असता हे अकाऊंट संदीप जाधव याचे असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याला सातारा येथून ताब्यात घेतले. त्याच्याकडील मोबाईल, सीमकार्ड जप्त केले असून त्याला अधिक तपासासाठी चतु:शृंगी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रुपाली पवार, कर्मचारी उमा पालवे, संतोष जाधव, शाहरुख शेख यांनी केली आहे. सोशल मीडियाद्वारे येणारे ओळखीचे असल्याचे सांगून अज्ञात व्यक्तीकडून फ्रेंड रिक्वेस्ट पाठवत असेल तर त्याला प्रतिसाद देऊ नका. तसे काही कोणाबाबत घडले असेल, तर त्यांनी तत्काळ सायबर पोलीस ठाण्याशी संपर्क साधा, असे सायबर पोलीस ठाण्याकडून आवाहन करण्यात आले आहे.

लोकमत – दि. ४ नोव्हेंबर, २०१९

# गांजाची विक्री करणारा अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क




पुणे : सार्वजनिक शौचालयाच्या जवळ बेकायदेशीररीत्या गांजाची विक्री करणाऱ्यास दत्तवाडी पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक कुलदीप संकपाळ (वय ३५, दत्तवाडी पोलीस स्टेशन) यांनी फिर्याद दिली आहे.

संकेत उर्फ संक्या निवृत्ती भिसे (वय २२, रा. चाळ नंबर, १३४/७ शिवदर्शन, पर्वती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पावणे सातच्या सुमारास शिवदर्शन येथील सार्वजनिक शौचालयाच्या जवळ ही घटना घडली. आरोपीकडून एक किलो ९३ ग्रॅम वजनाचा आणि १४ हजार ५८६ रुपयांचा गांजा जप्त केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

आरोपीकडे अधिक तपास करण्याकरिता, तसेच आरोपीने माल कोठून आणला, कोणाकडून घेतला, तसेच मालाची विक्री कुणाला करणार होता यासंदर्भात तपासणी करण्याकरिता सरकारी वकिलांनी पोलीस कोठडीची मागणी केली. न्यायालयाने ती मान्य केली.

लोकमत – दि. ९ नोव्हेंबर, २०१९

# सराईताला गावठी पिस्तुलासह अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सराईत गुन्हेगाराकडून गुन्हे शाखा युनिट तीनच्या पथकाने एक गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे असा चाळीस हजार आठशे रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अनमोल ऊर्फ चिंटू अतुल जाधवराव (वय २८, रा. कोथरूड) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध कोथरूड पोलीस ठाण्यात आर्म अ‍ॅक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीवर २०१३ मध्ये खुनाचा प्रयत्न केल्याचा चतु:शृंगी पोलीस ठाण्यात व कोथरूड पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल आहे. जानेवारी २०१९ मध्ये पोलिसांनी रेकॉर्डवरील गुन्हेगार समाधान राऊत याला अटक केली होती. त्यावेळी त्याच्याकडे दोन पिस्तूल व काडतुसे असा दीड लाखाचा मुद्देमाल मिळून आला होता. याबाबत त्याच्याकडे चौकशी केली तेव्हा त्याने ही शस्त्रे अनमोल जाधवराव व त्याचा मित्र मंदार कदम (रा. कऱ्हाड) याच्याकडून घेतल्याचे सांगितले होते. खातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार निरीक्षक राजेंद्र मोकाशी यांच्या मार्गदर्शनाखाली, सहायक निरीक्षक ढवळे, उपनिरीक्षक संजय गायकवाड, किरण अडागळे, कर्मचारी किशोर शिंदे, संतोष क्षीरसागर, प्रवीण तापकीर यांच्या पथकाने सापळा रचून अनमोल जाधवराव याला हॉटेल पिकॉक सुभाषनगर या ठिकाणाहून ताब्यात घेतले.

लोकमत – दि. ४ नोव्हेंबर, २०१९

# पंचतारांकित हॉटेलमधून लॅपटॉपची चोरी

## रामवाडीतील घटना : आरोपीला केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : नगर रस्त्यावरील रामवाडी येथील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये सेमीनारकरिता आलेल्या एका व्यक्तीचा लॅपटॉप व एक सुटकेस चोरी केल्याप्रकरणी एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी येरवडा पोलिसांनी एकाला अटक केली असून, यायाचत थोटा व्यंकटा नागेंद्र अंजी रतनकुमार (वय ५६, रा. विजयवाडा, आंध्र प्रदेश) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी आरोपीकडून सहा हजार रुपयांची अमेरिकन टुरिस्टर कंपनीची सुटकेस व ४० हजार रुपयांचा लॅपटॉप जप्त केला आहे.

अतुल रमेशलाल छाजेड (वय ४१, रा. अरिहंत अपार्टमेंट, मंगळवार पेठ) यास अटक करण्यात आली आहे. ही घटना ७ नोव्हेंबर रोजी दुपारी पावणेदोन ते सव्वादोनच्या सुमारास हॉटेल हयात रिजेन्सी येथे घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी रतनकुमार आपल्या आणखी दोन सदस्यांसह ६ ते ८ नोव्हेंबर रोजी हॉटेल हयात येथे होणाऱ्या एका सेमीनारसाठी आले होते. ७ नोव्हेंबर रोजी दुपारी पावणेदोनच्या सुमारास फिर्यादी यांनी आपली सुटकेस व लॅपटॉप बॉलरूममधील एका कॉर्नरजवळ ठेवली आणि ते जेवणाकरिता निघून गेले. ते पुन्हा सव्वादोनच्या सुमारास आल्यानंतर त्यांना त्या ठिकाणाहून सुटकेस व लॅपटॉप नसल्याचे दिसून आले. त्यांनी हॉटेलमधील सीसीटीव्हीची तपासणी केली असता साधारण ४० ते ४५ वर्षांची एक व्यक्ती सुटकेस घेऊन जाताना दिसून आली.

या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनूस शेख, सहायक पोलीस निरीक्षक राहुल गिरमकर, सहायक पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब बहिरट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. त्यांना पोलीस नाईक मनोज कुदळे, नवनाथ मोहिते यांनी सहाय्य केले.

पुढारी – दि. १३ नोव्हेंबर, २०१९

# जामिनासाठी बनावट प्रतिज्ञापत्रप्रकरणी वकिलाला अटक

पुणे : प्रतिनिधी

[illegible]

The Indian EXPRESS - 23 November, 2019

# Crime Branch busts gang using stolen trucks in MP mines, 1 held

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, NOVEMBER 22

THE PUNE City Police Crime Branch has claimed to have busted a gang of criminals that was putting stolen trucks to use after changing their registration numbers in coal mines in Madhya Pradesh. Police have arrested a gang member and have launched a search for others.

A team from Unit II of the Crime Branch received a tip off that a truck stolen from the jurisdiction of Bharti Vidyapeeth police station in Pune was being used by changing the registration and chassis number at Sarni town in Madhya Pradesh's Betul district. A team from Unit II was sent to Betul, where it found that the truck was in Nagpur.

**Police also said that the stolen trucks were being used to apply for loans from finance companies**

In Nagpur, the Pune police team seized two trucks, including the one stolen from Pune. On Thursday, Crime Branch officers arrested one Shabbir Ali Sayyed, a resident of Ashirwad Nagar in Nagpur, who is part of the racket.

According to police, the gang used to change either the chassis or registration number or both of stolen trucks and put them to use in coal mines in surrounding areas of Katni, Chhindwara and Indore in Madhya Pradesh. The police team has now launched a search for other suspects.

Police also said that the stolen trucks were being used to apply for loans from finance companies.

पुढारी – दि. १९ नोव्हेंबर, २०१९

# गुन्हे शाखेचे 'ऑपरेशन ऑल आउट'



## हॉटेल, बार, पब, मसाज सेंटरसह १५० तडीपार गुन्हेगारांची तपासणी

पुणे : प्रतिनिधी

गुन्हे शाखेच्या विविध पथकांनी संयुक्तरीत्या मोहीम हाती घेत शहरातील सराईत गुन्हेगारांची 'ऑपरेशन ऑल आउट'च्या माध्यमातून झाडाझडती घेतली. या वेळी रेकॉर्डवरील १५० तडीपार गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली, त्यातील १३ गुन्हेगार कारागृहात आढळले.

संघटित गुन्हेगारी करणाऱ्या टोळ्यांतील आरोपींचीदेखील झाडाझडती घेण्यात आली, त्यामधील २५ गुन्हेगार त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणी मिळून आले. त्यांच्या हालचालींवर पोलिसांकडून विशेष लक्ष ठेवण्यात येत असल्याची माहिती गुन्हे शाखेचे अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांनी दिली.

अवैध धंद्यांसह शहरातील हॉटेल, बार, पबची तपासणी केली गेली. या वेळी रात्री उशिरापर्यंत बेकायदेशीर चालू असणाऱ्या व्यवसायांवर पोलिसांनी खटले दाखल केले आहेत. तसेच ७ लॉज व ३१ मसाज पार्लरची तपासणी केली असताना त्यातील एका मसाज पार्लरवर कारवाई करण्यात आली. त्यामध्ये थायलंड देशाचे नागरिकत्व असलेल्या चार महिला मिळून आल्या.

पुढील कारवाईसाठी त्यांना कोरेगाव पार्क पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. यामध्ये उपायुक्त (सायबर व आर्थिक गुन्हे) संभाजी कदम, सहायक पोलिस आयुक्त डॉ. शिवाजीराव पवार, विजय चौधरी, १७ वरिष्ठ पोलिस निरीक्षक, ११ सहायक पोलिस निरीक्षक/उपनिरीक्षक आणि १०९ पोलिस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता.

लोकमत – दि. २५ नोव्हेंबर, २०१९

# विमाननगरच्या स्पा सेंटरमधील सेक्स रॅकेटचा पर्दाफाश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या फॉर्च्युन थाई स्पावर छापा टाकून पोलिसांनी सेक्स रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. येथे थेरपिस्ट म्हणून काम करणाऱ्या तीन थाई तरुणींची सुटका केली आहे. स्पा सेंटरच्या महिला व्यवस्थापिकेसह स्पामालकाला अटक केली आहे.

महेश गुंडटी असे स्पामालकाचे नाव आहे. सहायक पोलीस फौजदार राजू बहिरट यांनी फिर्याद दिली आहे.

विमाननगर येथील फिनिक्स मॉल चौकातील ललवानी प्रेस्टीज येथे फॉर्च्युन थाई स्पा हे मसाज सेंटर आहे. या ठिकाणी मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालत असल्याची माहिती येरवडा पोलिसांना मिळाली. त्यांनी शनिवारी रात्री साडेनऊ वाजता तेथे बनावट ग्राहक पाठविले. त्याने खात्री देताना पोलिसांनी थाई स्पावर छापा टाकला. एक स्वाईप मशीन, मोबाईल व ७ हजार ३५० रुपये जप्त केले आहेत.

या तरुणींची महिला सुधारगृहात रवानगी केली आहे. पोलीस निरीक्षक अजय वाघमारे, सहायक निरीक्षक बलभीम ननवरे, सहायक फौजदार बाळासाहेब बहिरट, हवालदार बाळासाहेब गायकवाड, किरण खुडे, हणमंत जाधव, मनोज कुदळे, अशोक गवळी, रामदास घावटे, श्रीकांत बनसुडे, थांडे, मोना नवले, शिवानी जगताप यांनी ही कामगिरी केली आहे.

लोकमत – दि. ४ नोव्हेंबर, २०१९

# मोबाईल हिसकावल्याप्रकरणी एकास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पादचाऱ्याचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून नेल्याप्रकरणी कोरेगाव पार्क पोलिसांनी एकाला अटक केली. न्यायालयाने त्याला ५ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीमध्ये ठेवण्याचा आदेश दिला.

अलीरजा ऊर्फ अयनु हुसेन इराणी (वय १९, रा. लोणी काळभोर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी आणखी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रंगीग अभम वशम (वय २२) यांनी फिर्याद दिली आहे. १२ ऑक्टोबर रोजी कोरेगाव पार्क परिसरात ही घटना घडली.

वशम हे मित्राचा फोन आल्याने फोनवर बोलत पायी निघाले होते. त्या वेळी त्यांच्या समोरून येणाऱ्या आरोपींनी त्यांच्या हातातील मोबाईल जबरदस्तीने हिसकावून नेला, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी अलीरजा याला न्यायालयात हजर केले असता, गुन्ह्याच्या तपासासाठी त्याला पोलीस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकिलांनी केली.

सामना – दि. १ नोव्हेंबर, २०१९

# टोलवरील सीसीटीव्हीच्या मदतीने तिघा चोरट्यांना पकडले

पुणे, दि. ३१ (प्रतिनिधी) – [illegible]

- सव्वा लाखाचा ऐवज जप्त
- फरासखाना पोलिसांची कारवाई

[illegible]

# अमली पदार्थप्रकरणी कोठडी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अमली पदार्थ बेकायदा पद्धतीने विक्रीसाठी बाळगल्याप्रकरणी पुणे पोलिसांनी अटक केलेल्या दोघा नायजेरियन व्यक्तींना कोर्टाने २० नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी डी. एम. निराळे यांच्या कोर्टाने हा आदेश दिला.

या प्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी केलची नवानी (वय ४१) आणि कोई ओकेई (वय २९, दोघे रा. नायजेरिया) या दोघांना अटक केली होती. पोलिस उपनिरीक्षक प्रतापसिंह मानिकराव शेळके यांनी फिर्याद दाखल केली आहे. अटक आरोपी परदेशी नागरिक असून, त्यांच्याकडून पाच लाख १६ हजार ४० रुपये किमतीचा मेथाक्युअलोन हा अमली पदार्थ, रोख रक्कम, सहा मोबाइल फोन आणि पासपोर्टची कलर प्रिंट जप्त करण्यात आली आहे.

पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत बुधवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास न्यू क्लब ऑफ पूनासमोरील रस्त्यावरून आरोपींना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून ८८ ग्रॅम मेथाक्युअलोन हा अमली पदार्थ आणि इतर ऐवज जप्त करण्यात आला. त्यांच्याकडे अधिक तपास करण्यासाठी त्यांना पोलिस कोठडी देण्यात यावी, अशी मागणी सरकारी वकील मैथिली काळवीट यांनी कोर्टात केली.




'अटक आरोपी नायजेरिया येथील आहेत. त्यांनी हे अमली पदार्थ विक्रीसाठी कोठून आणले? हे अमली पदार्थ विक्रीमागे मोठी आंतरराष्ट्रीय टोळी कार्यरत आहे का? आरोपींनी गुन्ह्यात याचा मोठा साठा केल्याची शक्यता आहे. त्यांचे इतर साथीदार कोण आहेत? ते भारतात कधीपासून आहेत, याचा तपास करण्यासाठी त्यांची पोलिस कोठडी देण्यात यावी,' असा युक्तिवाद काळवीट यांनी केला.

## तलाठ्याला कोठडी

खरेदी केलेल्या जमिनीची नोंद सातबाऱ्यावर करण्यासाठी ७० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून ५० हजार रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या तलाठ्याला १६ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. विशेष न्यायाधीश एस. आर. नावंदर यांच्या कोर्टाने हा आदेश दिला.

या प्रकरणी सचिन तुकाराम जाधव (वय ३९, रा. मुळशी) या तलाठ्याला अटक करण्यात आली आहे. एका तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. खरेदी केलेल्या जमिनीची नोंद सातबाऱ्यावर करण्यासाठी ७० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून ५० हजार रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी जाधवला अटक करण्यात आली. त्याला अटक करून कोर्टात हजर करण्यात आले.

या गुन्ह्याचा अधिक तपास करण्यासाठी पोलिस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकील प्रेमकुमार अगरवाल यांनी केली. पोलिस कोठडीला बचाव पक्षाचे वकील ॲड. विकास शहा आणि ॲड. सुहास कोल्हे यांनी विरोध केला.

सामना – दि. ४ नोव्हेंबर, २०१९

# नंबर प्लेट बदलून ट्रक वापरणाऱ्यास अटक

पुणे, दि. २२ (प्रतिनिधी) – पुण्यातून फसवणूक करून नेलेल्या ट्रकचे रजिस्ट्रेशन, चॅसी नंबर बदलून त्याद्वारे इतर राज्यांत व्यवसाय करणाऱ्या टोळीचा गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने पर्दाफाश केला. नंबर बदलून वापरण्यात येत असलेले दोन ट्रक पोलिसांनी ताब्यात घेतले. याप्रकरणी शब्बीर अली सय्यद (आशीर्वादनगर, नागपूर) यास अटक केली आहे.

युनिट दोनचे पथक गस्त घालत होते. यादरम्यान पोलीस उपनिरीक्षक नितीन शिंदे यांना माहिती मिळाली की, पुण्यातून फसवणूक करून नेलेले ट्रकचे नंबर बदलून ते मध्य प्रदेशातील सारणी येथे वापरण्यात येत आहेत. यानुसार तत्काळ पोलिसांचे एक पथक सारणी येथे दाखल झाले. यानंतर सदर ट्रक नागपूर येथे मालवाहतुकीसाठी गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी नागपूर येथून ६० लाख रुपये किमतीचे दोन ट्रक आणि शब्बीर सय्यद याला ताब्यात घेतले.

## दोन ट्रक जप्त

ट्रकच्या नंबरबाबत तपास केला असता, ते फसवे असल्याचे निष्पन्न झाले आहे. जप्त करण्यात आलेल्या एका ट्रकबाबत भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. तर, दुसरा ट्रक हा टोळीतील एकाने फायनान्स कंपनीचे हप्ते चुकविण्यासाठी त्याच्या नंबरमध्ये बदल करून वापरत असल्याचे समोर आले आहे. तपास युनिट दोनच्या पथकाकडून सुरू आहे.

प्रभात – दि. २३ नोव्हेंबर, २०१९

# दुचाकी चोरीप्रकरणी दोघांना अटक

पुणे, दि. २२ - पार्क करून ठेवलेली दुचाकी चोरल्याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी दोन तरुणांना अटक केली. त्याला २५ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीमध्ये ठेवण्याचा आदेश प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पी. एस. जोंधळे दिला.

सागर गणेश सुतार (वय २०, रा. शिवणे), हितेश सुरेश मानकर (वय २०, रा. सांगरून, ता. हवेली) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत रोहन अशोक सगर (वय २७) यांनी फिर्याद दिली आहे. ही घटना २४ सप्टेंबर रोजी रात्री साडेअकरा ते २५ सप्टेंबर २०१९ रोजी सकाळी ११ च्या सुमारास शनिवार पेठ परिसरात ही घटना घडली. सगर यांच्या बहिणीने त्यांची दुचाकी शनिवार पेठेतील एका बिल्डींगच्या समोर लॉक करून पार्क केली. चोरट्याने ती चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी दोघांना अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. त्यावेळी त्यांनी अशाप्रकारचे आणखी गुन्हे केले आहेत का? त्यांचा आणखी कोणी साथीदार आहे का? याचा तपास करण्यासाठी पोलीस कोठडी देण्याची मागणी सहायक सरकारी वकील विजयसिंह जाधव यांनी केली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १५ नोव्हेंबर, २०१९

# सोनसाखळीचोरांकडून आठ गुन्हे उघडकीस

म. टा. प्रतिनिधी, पुणे



खराडी बायपास रस्त्यावर नाकाबंदीदरम्यान दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता, सोनसाखळीचोरीचे आठ गुन्हे उघडकीस आले. त्यांच्याकडून दहा तोळे वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.

सोनसाखळीचोरीला प्रतिबंध करण्यासाठी चंदननगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत दुर्गामाता मंदिराजवळ नाकाबंदी करण्यात आली होती. त्या वेळी दोन अल्पवयीन मुले दुचाकीवरून रॅडिसन हॉटेलकडून येत असताना, पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा इशारा केला असता, त्यांनी जड वाहनाच्या आडोशाने पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी नाकाबंदी करणाऱ्या पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन, त्यांची चौकशी केली. त्या वेळी धक्कादायक माहिती समोर आली. चंदननगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चार, लोणी काळभोर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दोन आणि विमानतळ व लोणीकंद पोलिस ठाण्याच्या हद्दीतील प्रत्येकी एका गुन्ह्याची कबुली त्यांनी दिली. त्यांच्याकडून १० तोळे वजनाचे चोरलेले दागिने जप्त केले. चंदननगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शंकर खटके, निरीक्षक (गुन्हे) प्रकाश पासलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक गजानन जाधव, हवालदार पंडित गावडे, मोहन वाळके, रवींद्र रोकडे, अजित धुमाळ, प्रदीप सोनवणे, राजेंद्र दीक्षित, पोलिस नाईक चेतन गायकवाड, तुषार आल्हाट, दत्ता शिंदे, शकुर पठाण यांनी ही कामगिरी केली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १६ नोव्हेंबर, २०१९

# वेश्या व्यवसायप्रकरणी तिघांना अटक

## येरवडा पोलिसांची कारवाई; तरुणीची सुटका



म. टा. प्रतिनिधी, येरवडा

येरवडा परिसरात एका वस्तीमध्ये भाड्याने घर घेऊन वेश्या व्यवसाय करणाऱ्या तीन जणांना पोलिसांनी अटक केली आहे. यामध्ये दोन महिलांचा समावेश आहे.

समीना युसूफ शेख (वय ४५, रा. यशवंतनगर, येरवडा), रेखा राजू झेंडे (वय ३८, रा. धाटनगर, येरवडा) यांच्यासह मोसे भास्करराव जाधव (वय ३४, रा. यशवंतनगर येरवडा) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. सामाजिक सुरक्षा विभागाच्या कर्मचारी राजश्री मोहिते यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यशवंतनगरमध्ये आरोपींनी भाड्याने खोली घेतली होती. त्याठिकाणी समीना शेख आणि रेखा झेंडे या घेऊन वेश्या व्यवसाय करीत असल्याची माहिती सामाजिक सुरक्षा विभागाला मिळाली होती. पोलिसांनी खातरजमा केल्यानंतर गुरुवारी सायंकाळी येरवडा पोलिसांच्या मदतीने बनावट ग्राहक पाठविला. या वेळी एका पंचवीस वर्षीय तरुणीला पैशाचे आमिष दाखवून वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त करण्यात आल्याचे समोर आले. पोलिसांनी त्वरित छापा टाकून तीन जणांना अटक केली. पीडित तरुणीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आजवर लहान मोठे हॉटेल आणि लॉजमध्ये होणारा वेश्या व्यवसाय आता झोपडपट्टीत घरे भाड्याने घेऊन होत असल्याचे समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

लोकमत - दि. १९ नोव्हेंबर, २०१९

# खंडणीसाठी अपहरण करणाऱ्या मुख्य सूत्रधारासह तिघांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : मार्केट यार्डमधील बारदाना व्यापाऱ्याचे अपहरण करून दीड कोटी रुपयांची खंडणी घेणाऱ्या मुख्य सूत्रधारासह तिघांना वानवडी पोलिसांनी अहमदनगर येथे पकडले.

अजय बाळासाहेब सावळे (वय २४, रा. वडकी), आकाश अजिनाथ साळुंखे (वय २३, रा. भेकराईनगर, मूळ करमाळा, जि. सोलापूर) व सुनील सुभाष गायकवाड (वय २८, रा. वडकीगाव) अशी अटक केलेल्या तिघांची नावे आहेत. पोलिसांनी यापूर्वी सुजित किरण गुजर, ओंकार श्रीनाथ वाल्हेकर आणि अमित जगताप या तिघांना अटक केली होती. मात्र, मुख्य सूत्रधार अजय सावळे व व्यापाऱ्याचे प्रत्यक्ष अपहरण करणारे दोन जण फरार होते. त्यांचा तपास सुरु असताना पोलिसांना ३ आरोपी नगर जिल्ह्यातील भिंगार गावात असल्याची माहिती बातमीदारामार्फत मिळाली होती. त्यानुसार वानवडी पोलिसांच्या एका पथकाने लॉजवर छापा कारवाई केली असताना तिथे मिळून आले.

- गणात्रा यांची सुरक्षित सुटका झाल्याचे समजल्यानंतर पोलिसांनी तत्काळ सुजित व ओंकार या दोघांना सुरुवातीला अटक केली. त्या वेळी त्यांच्याकडील चौकशीत मुख्य आरोपी हा अजय सावळे असून, त्याचे आणखी साथीदारांची नावे निष्पन्न झाली होती. अजय सावळे याचा गणात्रा यांच्याशी चांगला परिचय होता. त्यांच्या व्यवहाराची माहिती असल्यानेच त्याने खंडणीसाठी हा कट रचला होता.
- तेव्हापासून गुन्हे शाखा आणि परिमंडळ ५ च्या अंतर्गत पोलीस ठाण्यांची पथके त्यांच्या मागावर होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतिकुमार पाटील, गुन्हे निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली वानवडी पोलीस ठाण्याच्या पथकाला या तिघांना पकडण्यात यश आले.

मार्केट यार्ड येथील व्यापारी कांतिलाल गणात्रा (वय ६५, रा. सिटी पार्क, मार्केट यार्ड) यांचे अपहरण केले होते. त्यानंतर त्यांच्याच मोबाईलवरून त्यांच्या मुलाला फोन करून खंडणीची मागणी केली होती. वडिलांच्या जिवाला धोका नको म्हणून आम्ही दीड कोटी देण्यास तयार असल्याचे सांगितले. मात्र, गणात्रा यांच्या जिवाचा धोका लक्षात घेऊन रक्कम घेण्यास दुचाकीवरून आलेल्या आरोपींना पकडण्यात आले नाही. दुचाकीवरील आरोपींनी थोड्या अंतरावर जाऊन रक्कम फॉर्च्युनर वाहनातून आलेल्या साथीदारांकडे सोपवली. दरम्यान, पैसे मिळाल्याची खातरजमा झाल्यावर आरोपींच्या साथीदारांनी गणात्रा यांना सोडून दिले होते.

लोकमत - दि. १७ नोव्हेंबर, २०१९

# लॅपटॉप चोरणाऱ्या रिक्षा चालकाला केले अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

विमाननगर : रिक्षातील प्रवाशाच्या लॅपटॉप चोरणाऱ्या रिक्षा चालकाला विश्रांतवाडी पोलिसांनी अवघ्या तीन तासात अटक केली. याप्रकरणी प्रविण अशोकराव आदिक यांच्या तक्रारी वरून रिक्षाचालक मुकुंद दिनेश मांडे (वय २७,रा. गणेशनगर, बोपखेल) याला चोरीच्या लॅपटॉपसह अटक करण्यात आली आहे.

पोलिस निरीक्षक अरूण आव्हाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर रोजी प्रविण आदिक हे कामानिमित्त विश्रांतवाडी येथे आले होते. प्रवासा दरम्यान त्यांचा लॅपटॉप चोरीला गेला. याप्रकरणी तक्रार दाखल करण्यासाठी ते विश्रांतवाडी पोलिस स्टेशन येथे आले होते. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार विश्रांतवाडी तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ चोरीला गेलेला लॅपटॉपचा शोध घेण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार परिसरातील सीसीटिव्ही फुटेजवरून सदरचा लॅपटॉप हा रिक्षा क्र.( एमएच १२ एचसी ३२८१) च्या चालकाने चोरल्याचे सीसीटिव्ही फुटेजवरून निष्पन्न झाले.

# बसमधील लॅपटॉपचोरी उघड

## साडेचार लाखांचे १९ लॅपटॉप जप्त

म. टा. प्रतिनिधी, पुणे

**शिवनेरी बसमध्ये प्रवासी म्हणून बसून प्रवाशांचे लॅपटॉप चोरणाऱ्या व्यक्तीसह दोघांना स्वारगेट पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून लॅपटॉप चोरीचे पाच गुन्हे उघडकीस आणून तब्बल चार लाख ४० हजार रुपये किमतीचे १९ लॅपटॉप जप्त करण्यात आले आहेत.**

दिलीप दशरथ डिकोळे (वय ३०, रा. पोटी, ता. करमाळा), समाधान भारत घोसले (वय ३१, रा. नेरले, ता. करमाळा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. स्वारगेट बस स्थानकामध्ये शिवनेरी व इतर बसमध्ये बसलेल्या प्रवाशांचे लॅपटॉप चोरीला जात असल्याच्या तक्रारी येत होत्या. पाच नोव्हेंबर रोजीदेखील एका व्यक्तीचा लॅपटॉप शिवनेरीमधून चोरीला गेला होता. त्यानुसार स्वारगेट पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक ब्रह्मानंद



नाईकवाडी यांनी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना तपास पथकाला दिल्या. तपास पथकाचे प्रमुख सुरेश जायभाय यांनी आरोपींचा शोध सुरू केला. तसेच, स्वारगेट बस स्थानकातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्या वेळी एक व्यक्ती संशयास्पदरीत्या दिसून आली. त्या व्यक्तीबाबत काही प्रवाशांकडे चौकशी करण्यात आली. त्या वेळी ती व्यक्ती करमाळा येथील असल्याचे समजले. त्यानुसार सापळा रचून पोलिसांनी दिलीपला त्याच्या गावातून ताब्यात घेतले. चौकशीत त्याने एसटी प्रवाशांचे लॅपटॉप चोरल्याची कबुली दिली. चोरी केलेले लॅपटॉप करमाळा तालुक्यातील नेरले गावात राहणाऱ्या समाधानला विकत असल्याचे त्याने सांगितले. त्यानुसार पोलिसांनी समाधानला ताब्यात घेऊन त्याच्याकडून चार लाख ४० हजार रुपयांचे १९ लॅपटॉप जप्त केले आहेत.

### अशा पद्धतीने करायचा चोऱ्या

आरोपी स्वारगेट, पुणे स्टेशन, शिवाजीनगर बस स्थानकातील शिवनेरी बसमध्ये प्रवासी म्हणून बसत होता. तो बसमध्ये बसताना त्या प्रवाशाजवळ लॅपटॉपची बॅग आहे, अशी जागा निवडायचा. स्वतःची लॅपटॉप नसलेली बॅग त्या बॅगेशेजारी ठेवायचा. बस सुरू होण्याच्या अगोदर दुसऱ्याची बॅग उचलून गडबडीने उतरायचा. पकडले गेले, तरी चुकून गडबडीत बॅग घेतली गेली, असे तो म्हणत असे. अशा पद्धतीने तो लॅपटॉप चोरत असल्याचे समोर आले आहे.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २४ नोव्हेंबर, २०१९

# मोबाइल चोरणाऱ्या दोघांना अटक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पादचाऱ्यांचा मोबाइल हिसकविणाऱ्या दोघांना सिंहगड रोड पोलिसांनी अटक केली आहे. तर, खडक परिसरात एका व्यक्तीचा मोबाइल हिसकविल्याचा प्रकार समोर आला आहे.

सचिन उर्फ बाळ्या पांडुरंग कचरे (वय २०, रा. कुरुंगवाडी, ता. भोर), महेश रमेश कांबळे (वय १९, रा. सारवी, ता. औसा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी दीपक निषाद (वय २४, रा. उत्तमनगर) याने सिंहगड रोड पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. निशाद हा वडगाव बुद्रुक भागातून शुक्रवीर पहाटे चारच्या सुमारास मित्राबरोबर जात होता. त्या वेळी कचरे आणि कांबळे तेथे आले. दोघांनी निषादला धमकाविले. त्याच्याकडील मोबाइल हिसकावून नेला. त्यानंतर घाबरलेल्या निशादने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिसांनी पसार झालेल्या दोघांना पकडले. शंकरशेठ रस्त्यावरील ढोले पाटील चौकात (सेव्हन लव्हज चौक) रात्री साडेनऊच्या सुमारास हुसेन शेख (वय ४०, रा. महर्षीनगर) यांच्याकडील मोबाइल दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी हिसकावून नेला. याबाबत शेख यांनी खडक पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. या प्रकरणी सहायक पोलिस निरीक्षक उमाजी राठोड अधिक तपास करत आहेत.



## क्राइम डायरी

### कारवाईला विरोध करणाऱ्यांवर गुन्हा

पुणे : पुणे स्टेशन परिसरात बेकायदा खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई सुरू असताना विरोध करणाऱ्यांवर पोलिसांनी गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे. अल्ताफ इस्माईल शेख (वय ३२, रा. पाटील इस्टेट) आणि देवा जियाराम पटेल (वय २७, रा. लोणी काळभोर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. महापालिकेच्या अतिक्रमण विभागातील सहायक निरीक्षक राजू लोंढे यांनी बंडगार्डन पोलिसात तक्रार दिली आहे.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १३ नोव्हेंबर, २०१९

# मुलीचे अपहरण करणारा अटकेत

पुणे : बुधवार पेठेतील रेडलाइट भागातील एका महिलेच्या दीड वर्षाच्या मुलीचे अपहरण करणाऱ्यास विश्रामबाग पोलिसांनी अटक केली आहे. दोन दिवसांपूर्वी ही घटना घडली होती.

याबाबत ३५ वर्षीय महिलेने तक्रार दिली होती. तक्रारदार महिला ही बुधवार पेठेत तीन वर्षांपासून वेश्या व्यवसाय करते. रविवारी तिच्याकडे एक ग्राहक आला होता. ती महिला त्याच्यासोबत एटीएम सेंटरमधून पैसे आणण्यासाठी गेली होती. त्या वेळी तिने सोबत तिच्या दीड वर्षाच्या मुलीला घेतले. आरोपीने महिलेला पैसे काढून दिल्यावर दोघांनीही दारू प्यायली. त्यानंतर ते जवळच्याच चित्रपट गृहात चित्रपट पाहण्यासाठी घेऊन गेला. चित्रपट सुटल्यावर तक्रारदार लघुशंका करण्यासाठी गेल्या, त्यामुळे आरोपीकडे त्यांनी दीड वर्षाच्या मुलीस ठेवले. तक्रारदार परत आल्यावर आरोपी मुलीला घेऊन निघून गेला होता. महिलेने परिसरात बरीच शोधाशोध केली; मात्र आरोपी सापडला नाही.

# Police bust gang that stole X-ray plates from hospitals

## Prime accused nabbed red-handed at Sancheti Hospital, which he had robbed in Oct

Archana.More
@timesgroup.com
TWEETS @Archana_Mirror

In a major breakthrough, Shivajinagar police busted a gang specialised in stealing X-ray plates from hospitals and arrested two people.

The two were nabbed red-handed in Sancheti Hospital, which they had robbed earlier in October.

They have been identified as Mohamedali Ismail Shaikh (59), a resident of Vadgaon Maval, and Atdillah Maniyar (34), a resident of Moshi. Police have recovered X-ray plates worth Rs 1.60 lakh from them, stolen from various hospitals. The price of an X-ray plate varies from Rs 50,000 to 60,000.

Shaikh, who is the prime accused, had visited Sancheti Hospital on October 9, and stolen two X-ray plates from the X-ray room. The security guard of the hospital, Sachin Yerunkar (42), had lodged a complaint with the Shivajinagar police on October 9.

When police checked the CCTV footage, they saw Shaikh stealing the plates and walking out of the facility.



A video grab of Shaikh at Sancheti Hospital

Following this, police posted his photograph in the hospital premises so that if he came back, people could identify him. Surprisingly, the accused visited Sancheti Hospital again on Thursday, pretending to be a patient. As soon as the security guard spotted him, he called the police.

During interrogation, the accused revealed that he had previously stolen X-ray plates from Bharati Vidyapeeth Medical College and Hospital, Universal Hospital at Kasba Peth, Wadia Hospital and Deenanath Mangeshkar Hospital. The gang had stolen X-ray plates worth Rs 15 lakh from various hospitals using the same modus operandi.

Shaikh and Maniyar were produced in the court on Friday. The police demanded seven-day custody but were granted only two days.

According to the police, Shaikh has multiple cases pending against him at Chennai. Police also suspect that there might be big syndicate active across the city, which targets large hospitals.

A case has been registered under section 380 (theft in a dwelling) and 34 (common intention) of the Indian Penal Code (IPC).

Sub-inspector Subbarao Lad, attached with Shivajinagar police station, told *Mirror*, "Shaikh used to visit the X-ray room, pretending to be a patient. After hospital employees went out of the room, he would pick up the X-ray plate and put it in the bag. The accused sold stolen plates in Chennai with the help of his relatives."

According to the officer, the accused seemed to be unaware he was recorded on video by CCTV cameras when he stole X-ray plates from Sancheti Hospital on October 9. Eyeing aother score, he showed up again at the hospital on Thursday, pretending to be a patient. "The security guard spotted him and called us. We nabbed him in the hospital and then he confessed that he had committed the same offence in few hospitals in the city," the officer added.

# एटीएम उचटकण्याचा प्रयत्न करणारा जेरबंद

म. टा. प्रतिनिधी, पुणे

कर्वेनगर रस्त्यावरील अभिनव विद्यालयाच्या जवळील एटीएम मशिनमध्ये चोरीचा प्रयत्न केल्याचा प्रकार सोमवारी पहाटे समोर आला. या प्रकरणी डेक्कन पोलिसांच्या गस्ती पथकाने एकाला एटीएम केंद्रातून अटक केली.

सतीश बाबूलाल धोत्रे (वय ४१, रा. कर्वे रस्ता) असे अटक केलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी पोलिस शिपाई विनोद कांबळे यांनी डेक्कन पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डेक्कन पोलिस ठाण्याचे कर्मचारी हद्दीत पेट्रोलिंग करत होते. त्या वेळी अभिनव विद्यालयाजवळ असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या एटीएम सेंटरमध्ये एकजण संशयास्पदपणे उभा असल्याचे पोलिसांना दिसून आले. त्यानुसार गस्तीवर असलेल्या पोलिसांनी तेथे जाऊन पाहणी केली. त्या वेळी सतीश एटीएम मशिनचा दरवाजा उचकटण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून आले. त्यानंतर त्याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. या प्रकरणी डेक्कन पोलिस अधिक तपास करीत आहेत.



## क्राइम डायरी

### मोबाइल टॉवर बसविण्याच्या नावाखाली फसवणूक

मोबाइल टॉवर बसवून देण्याच्या नावाखाली एका तरुणाची दोन लाख ४० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी विमाननगर पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोहगाव येथील एका ३१ वर्षीय व्यक्तीने या प्रकरणी फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादीला मोबाइलवरून कॉल फोन केला. एका नामांकित कंपनीचा मोबाइल टॉवर बसवून देण्याचे आमिष दाखवले. त्या बदल्यात चांगले भाडे मिळेल, असे सांगितले. त्यांच्या अमिषाला बळी पडून फिर्यादीने आरोपींच्या वेगवेगळ्या बँक खात्यात दोन लाख ४०, ९५० रुपये भरण्यास भाग पाडले, अशी फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

### दुभाजकाला धडकून तरुणाचा मृत्यू

पुणे : भरधाव वेगातील दुचाकी रस्ता दुभाजकाला धडकून झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला. हेल्मेट घातले नसल्यामुळे डोक्याला मार लागून तरुणाचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

चंद्रशेखर मधुकर राजगुरू (वय ४२, रा.वडगाव शेरी) या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री राजगुरू हे दुचाकीवरून होळकर पुलाकडे भरधाव वेगात जात असताना त्यांची दुचाकी दुभाजकाला धडकून ते गंभीर जखमी झाले. यात त्यांचा मृत्यू झाला, अशी फिर्याद दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक गिरी करीत आहे.

# अभिप्राय...

[illegible]

प्रति,

मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांना सविनय सादर,

प्रतिवेदक :- पी.एस.घाडे, महिला पोलीस शिपाई ७९१७, सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे

विषय :- दर्पन पुस्तकासंदर्भात अभिप्रायबाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती नागरिकांना समजावी या उद्देशाने पोलीस ठाणे येथे दैनंदिनी कामकाज करीत असताना झालेल्या चांगल्या कामगिरीबाबतची प्रेसनोट जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालयात सादर करणेबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस ठाणे येथे आठवड्याभरामध्ये झालेल्या चांगल्या कामगिरीची प्रेसनोट सादर करण्यात येत असुन सदरची प्रेस नोट वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदरचे पेपर कात्रनाची कटिंग करुन त्या पासुन दर्पन हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. सदरचे पुस्तक हे ठाणे अंमलदार कक्षामध्ये ठेवण्यात येत असुन पोलीस ठाणे येथे येणारे नागरिकांना सदरचे पुस्तक वाचण्यासाठी देण्यात येत असते.

दर्पन या पुस्तकामुळे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती एकत्रीतपणे वाचण्यासाठी मिळत असल्याने त्याबाबत समाधान व्यक्त करुन पोलीसांचे कौतुक करण्यात येत आहे.

मा. सादर व्हावे,
दि. १८/०६/२०१९

( पी.एस.घाडे )
महिला पोलीस शिपाई ७९१७
सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे शहर.



दुचाकी चोरीप्रकरणी दोघांना अटक
सारसबाग परिसरात लुटणारे अटकेत
कोयता बाळगणाऱ्या तडीपाराला अटक
प्रवाशाला लुटणाऱ्या रिक्षाचालकासह तिघे अटक
गांजाची विक्री करणारा अटकेत
Crime Branch busts gang using stolen trucks in MP mines, 1 held
Viman Nagar: 2 arrested with elephant tusks
तरुणीला अश्लील व्हिडीओ पाठविणाऱ्या तरुणाला अटक
महिलांचे शोषण करणाऱ्या भोंदूबाबाला अटक
रस्त्यावर पार्क केलेली दुचाकी चोरणाऱ्यास अटक
गंभीर मारहाणप्रकरणी दोघांना अटक
PROPERTY DISPUTE
3 held for 'threatening family at gunpoint'
तरुणपणाच्या प्रेमाची उतारवयात झळ
कोयते, हॉकी स्टिक बाळगणाऱ्यांना अटक
चंदनाची झाडे चोरणाऱ्यास अटक
3 held for cheating nine govt, private banks of Rs 59.5 lakh
City cops help tourist get back bag with valuables